सोलापूर तरुण भारत

# सदाफुली

https://daininktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com


बुधवार, १० जून २०२६

आतील पानावर

पान २–मी स्वत:ला देव समजत होतो, पण...
पान ३–श्रद्धाने दिली प्रेमाची कबुली?
पान ४– वाट इथे स्वप्नातील संपली जणू...
पान ५– साऊथ स्टार 'सूर्याचा' दिलदारपणा!
पान ७– 'ऑरेंज ज्यूस गँग' आता मोठ्या पडद्यावर!

# आलिया अन्‌ शर्वरीचा 'अल्फा' लवकरच भेटीला





सध्या थिएटर असो किंवा ओटीटी माध्यम असो थ्रिलर, रहस्यमय कथानक असलेल्या चित्रपटांना खूप पसंती मिळताना दिसतेय. प्रेक्षकांमध्ये देखील अशा चित्रपटांबद्दल खूप उत्सुकता असते. हल्ली अशा धाटणीचे बरेच चित्रपट आले तर काही प्रदर्शनाच्या मार्गावर आहेत. अल्फा हा त्यापैकीच एक. यशराज प्रोडक्शनची निर्मिती असलेला अल्फा या चित्रपटाबद्दल सध्या इंडस्ट्रीत खूप चर्चा आहे. खरं तर हा चित्रपट २०२५ मध्ये प्रदर्शित होणार होता; परंतु काही तांत्रिक कारणांमुळे चित्रपट प्रदर्शित करण्याची तारीख बदलण्यात आली. आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत एक महत्त्वाची माहिती हाती आली आहे. 'अल्फा' हा चित्रपट मूळात गेल्या वर्षी प्रदर्शित होणार होता. नंतर, चित्रपटाचे प्रदर्शन एप्रिल २०२६ पर्यंत पुढे ढकलण्यात आले. त्यानंतर, तो १० जुलै रोजी प्रदर्शित होईल अशी बातमी समोर आली. शिवाय हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित न होता, ओटीटीवरच रीलीज होणार, अशी चर्चा होती. आता, ताज्या माहितीनुसार, प्रदर्शनाची तारीख पुन्हा बदलण्यात आली आहे.'अल्फा' चित्रपटात आलिया भट्ट व शर्वरी वाघ मुख्य भूमिकांमध्ये पाहायला मिळणार आहेत. त्याशिवाय यामध्ये बॉलीवूड अभिनेता बॉबी देओलही महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. त्यामुळे या चित्रपट कधी प्रदर्शित होणार याकडे प्रेक्षकांचं लक्ष लागून राहिलं होतं. दरम्यान, रिपोर्टनुसार,'अल्फा'च्या प्रदर्शनाच्या तारखेत तिसऱ्यांदा बदल करण्यात आला आहे. हा चित्रपट आता ३ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित होईल, अशी माहिती मिळते आहे. सुत्रांच्या म्हणण्यानुसार ,'अल्फा' चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी ३ जुलै ही योग्य तारीख आहे, कारण त्याच दिवशी प्रदर्शित होणारा 'धमाल ४' आता १७ जुलैपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. ३ जुलै रोजी कोणताही मोठा चित्रपट प्रदर्शित होत नसल्यामुळे, निर्माते आदित्य चोप्रा यांचं 'अल्फा' चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्यासाठी हीच योग्य असल्याचं म्हणणं आहे. दरम्यान, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. 'अल्फा' या चित्रपटाच्या माध्यमातून आलिया भट्ट जवळपास २ वर्षांनंतर पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाली आहे. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जिगरा' चित्रपटानंतर आलियाचा एकही चित्रपट प्रदर्शित झालेला नाही. त्यामुळे 'अल्फा' सिनेमागृहांत प्रदर्शित होणं तिच्यासाठी तशी महत्त्वाची गोष्ट आहे. 'मुंज्या' चित्रपटामुळे लोकप्रियता मिळवलेली शर्वरी वाघसुद्धा या चित्रपटामध्ये झळकणार आहे. आलिया- शर्वरी यामधून पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांमध्येही या दोघींना एकत्र पाहण्यासाठी उत्सुकता आहे.



# मी स्वतःला देव समजत होतो, पण...

रॅपर हनी सिंगला त्याच्या गाण्यांमुळे प्रचंड लोकप्रियता मिळाली, पण प्रसिद्धीच्या हवा त्याच्या डोक्यात इतकी गेली की तो नशेच्या आहारी गेला. नंतर तो अनेक वादात अडकला. आता मात्र तो आपल्या चुका जाहीरपणे मान्य करतो. हनी सिंगला ड्रग्जचं व्यसन जडलं होतं. हे व्यसन अफाट पैसा आणि यशामुळे आलेल्या अहंकारातून जडल्याचं तो सांगते. इतकंच नाही तर शाहरुख खान, सलमान खान आणि अक्षय कुमार यांनी त्याला त्याच्या बिघडलेल्या जीवनशैलीबद्दल, वाईट सवयींबद्दल आणि चुकीच्या वागणुकीबद्दल अनेकदा चेतावणी दिली होती, त्याला समजावलं होतं. पण त्याने कोणाचंच ऐकलं नाही.

शाहरुख आणि अक्षयसह त्याच्या आजूबाजूच्या अनेकांना खूप आधीपासून वाटत होती. 'एबी टॉक्स' पोडकास्टवर हनी सिंगने याबद्दल सविस्तर सांगितलं. तो म्हणाला, २०११ ते २०१४ दरम्यान जेव्हा मी माझ्या करिअरमध्ये यशाच्या शिखरावर होतो, तेव्हा पैशाच्या नशेत मी भरकटलो. पैसा, प्रसिद्धी आणि ड्रग्जच्या नशेत मी सगळं काही विसरलोहोतो. मला कशाचंच भान नव्हतं. त्या काळात माझी पूर्ण विचारसरणीच बदलून गेली होती. माझी चालण्याची, बोलण्याची पद्धत आणि माझं वागणंही बदललं होतं. मी प्रत्येकाचा अपमान करायचो. मला असं वाटत होतं की माझ्याइतकं यशस्वी कोणीच झालं नाही. मी स्वतःला देव समजू लागलो होतो आणि स्वतःला देव म्हणायचोसुद्धा. हनी सिंगने पुढे सांगितलं की, खूप कमी वयात मिळालेलं यश आणि व्यसनाधीनता यामुळे तो अत्यंत गर्विष्ठ आणि क्रूर बनला होता. या मानसिक स्थितीला त्याने इंग्रजीत 'डीमनिक स्टेट ऑफ माईंड' असं म्हटले. मला स्वतःलाही माझं ते रूप अजिबात आवडत नव्हतं आणि यासाठी कोणतीही प्रसिद्धी किंवा इंडस्ट्री जबाबदार नव्हती, तर मी स्वतःच जबाबदार होतो, असं हनी सिंग म्हणाला. फिल्म इंडस्ट्रीतील दिग्गज कलाकारांनी हनी सिंगला नशा न करण्याचा आणि चांगलं आयुष्य जगण्याचा सल्ला दिला होता. अमिताभ बच्चन, सलमान खान, शाहरुख खान, अक्षय कुमार हे सगळे माझ्यावर बारीक लक्ष ठेवून होते. मी जे काही करतोय, ते सगळं थांबवावं असं त्यांनी मला समजावलं होतं. शाहरुख खान आणि अक्षय कुमार यांनी तर मला चेतावणी दिली होती. 'तू जेकाही करत आहेस, त्यामुळे तू एक दिवस संपशील, तू बरबाद होशील' असं त्यांनी म्हटलं होतं, असं हनी सिंगने सांगितलं. दरम्यान, २०१४ मध्ये हनी सिंगची प्रकृती बिघडली. त्यानंतर तीन वर्षे तो घराबाहेर पडलाच नव्हता. तो सगळ्यांपासून दुरावला आणि व्यसनाच्या आहारी गेला की त्यातच त्याला 'बायपोलर डिसऑर्डर' जडला. या आजाराच्या औषधांमुळे त्याचे सगळे केस गळून गेले. २०१४ मध्ये त्याने ड्रग्ज घेणं बंद केलं, पण त्यातून बरं व्हायला त्याला ७ ते ८ वर्षे लागली.






# लवकरच येणार 'गदर ३'

'गदर' या पहिल्या भागाच्या यशानंतर पुन्हा कधी तारा सिंह आणि सकिनाला मोठ्या पडद्यावर पाहता येईल असे सिनेरसिकांना वाटले नव्हते. पण ती संधी पुन्हा मिळाली. २०२३ मध्ये सनी देओल आणि अमिषा पटेल यांचा 'गदर २' हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला. फक्त ६० कोटी रुपये खर्चून बनवलेल्या 'गदर २'नं जगभरात ६९१ कोटी रुपयांचा जबरदस्त गल्ला केला. आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाला तीन वर्षे उलटली आहेत. दरम्यान आता अमिषा पटेलनं तिसऱ्या भागाबद्दल मोठी अपडेट दिली आहे. 'गदर २'च्या प्रचंड यशानंतर आता चाहत्यांना त्याच्या तिसऱ्या भागाची प्रतीक्षा आहे. अमिषा पटेलने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द आणि इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत 'गदर ३' नक्कीच बनवला जाईल, अशी पुष्टी केली आहे. अमिषाने म्हटले आहे की, गदर ३ नक्कीच येणार आहे आणि जेव्हा तो येईल, तेव्हा थिएटरमध्ये धुमाकूळ माजेल. प्रेक्षकांचे प्रेम आणि देवाच्या आशीर्वादामुळे 'गदर' सारख्या ब्रँडसाठी ५०० कोटींचे कलेक्शन आता एक सामान्य आकडा झाला आहे. यावेळी चित्रपटाचा आवाका आणि पटकथा पूर्वीपेक्षा अधिक भव्य आणि 'स्फोटक' असेल, असेही तिने स्पष्ट केले. 'गदर ३' व्यतिरिक्त अमिषा पटेल तिच्या गाजलेल्या 'हमराज' चित्रपटाच्या सिक्वेलमुळेही चर्चेत आहे. निर्माते रतन जैन यांनी 'हमराज २' साठी योग्य पटकथेचा शोध सुरू असल्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आगामी काळात अमिषाचे एकापाठोपाठ एक मोठे चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.

# ... म्हणून सुश्मिताने लग्न केलं नाही?

बॉलीवूडची सर्वात ग्लॅमरस आणि लोकप्रिय अभिनेत्री सुश्मिता सेन आपल्या दमदार अभिनयासोबतच बिंधास्त आणि मनमोकळ्या स्वभावासाठी ओळखली जाते. व्यावसायिक आयुष्याबरोबरच ती तिच्या खासगी आयुष्याबद्दलही नेहमीच खूप मोकळेपणाने बोलते. सुश्मिता सध्या ५० वर्षांची आहे, पण तिने अजून लग्न केलेलं नाही. ती सिंगल असून तिच्या रेने आणि अलिसा या दोन मुलींचा एकटीने सांभाळ करतेय. सुश्मिताने लग्न का केलं नाही, असा प्रश्न अनेकांना पडतो. तर आता तिने लग्न न करण्यामागचे खरे कारण सांगून सर्वांनाच चकित केले आहे. तिच्या या वक्तव्याने चाहत्यांचे लक्ष वेधले आहे.

सुश्मिताने एका मुलाखतीत अविवाहित राहण्याचं कारण स्पष्ट केलं होतं. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी गरज म्हणजे माझं स्वातंत्र्य आहे. मी एक स्वतंत्र विचारांची व्यक्ती आहे. मी जे काही करते ते मनापासून करते, कोणत्याही अपेक्षेपोटी करत नाही. मी अजूनही सिंगल आहे कारण मला अजूनपर्यंत अशी कोणतीही व्यक्ती भेटलेली नाही, जिच्याबरोबर मला माझे संपूर्ण आयुष्य घालवावेसे वाटेल. माझ्या आयुष्यात प्रेमाची अजिबात कमतरता नाही. अनेकांना वाटतं की संवेदनशीलता लग्नानंतर येते, पण माझ्याकडे दोन गोड मुलींच्या रूपाने त्या आधीपासूनच आहेत. मी एकटीनेच त्यांचा सांभाळ केला आहे, असं सुश्मिता सेन म्हणाली होती. मला माझ्या आयुष्यात कोणत्याही गोष्टीची उणीव भासत नाही. मला फक्त एवढंच वाटतं की या जगात अनेक चांगल्या गोष्टी आहेत. मला माझ्या अटींवर आयुष्य जगायचं होतं आणि मी तेच करतेय. मी लोकांचे विचार ऐकले, पण स्वतःला नेहमी हाच प्रश्न विचारला की मला नक्की काय हवं आहे. मी सगळ्यांचं ऐकतं, पण करते मात्र तेच जे माझ्या मनाला पटतं, असं सुश्मिता सेनने म्हटलं होतं.

दरम्यान, सुश्मिता सेनने १९९४ साली अवघ्या १८ व्या वर्षी 'मिस युनिव्हर्स'चा किताब जिंकला होता. यानंतर तिने 'मै हूं ना' आणि 'आंखें' यांसारख्या अनेक यशस्वी बॉलीवूड चित्रपटांमध्ये काम केले. तिने लग्न न करता रेने आणि अलीशा या दोन मुलींना दत्तक घेतले असून, ती त्यांचा सांभाळ करतेय.





# आदित्यला डेट करतेय तारा

बॉलिवूड वर्तुळात आता नव्या अफेयरची चर्चा रंगू लागली आहे. अभिनेत्री तारा सुतारिया आणि वीर पहाडिया यांचा यापूर्वीच ब्रेकअप झाला आहे. आता तारा ही आदित्य रॉय कपूरला डेट करत असल्याचे समोर आले आहे. आदित्य आणि तारा हे आगामी काळात 'ओम' चित्रपटात एकत्र दिसून येणार आहेत. परंतु याचदरम्यान दोघेही आता अधिकृतपणे परस्परांना डेट करत असल्याचे कळते. आदित्य आणि तारा यांना अनेक सोहळे आणि खासगी पार्ट्यांमध्ये एकत्र पाहिले गेले आहे. ओम चित्रपटाच्या वर्कशॉपदरम्यान त्यांच्यातील केमिस्ट्री अनेकांच्या नजरेत आली होती. परंतु आता दोघेही नात्यात अडकत असल्याचे दिसून येत आहे. दोन्ही कलाकार स्वत:चे आयुष्य खासगी ठेवण्यासाठी ओळखले जातात. आदित्य आणि तारा हे परस्परांसोबत चांगला वेळ घालवत आहेत. तसेच त्यांच्या निकटवर्तीयांनी त्यांच्यात एका मजबूत नात्याचे संकेत दिले आहेत. तारा अलिकडेच मुंबईत नव्या घरात रहायला गेली आहे. तारा आणि वीर यांचा या वर्षाच्या प्रारंभी ब्रेकअप झाला होता. परंतु त्यानंतर ताराने आता नव्या रिलेशनशिपमध्ये जात मागील घटनाक्रम विसरून गेल्याचे संकेत दिले आहेत.



# दिलजीतच्या चित्रपटात शर्वरी

वेलकम 'मैं वापस आऊंगा' या चित्रपटाचा ट्रेलर निर्मात्यांनी जारी केला आहे. या चित्रपटाद्वारे इम्तियाज अली पुन्हा एकदा प्रेमाच्या वेदनेची कहाणी प्रेक्षकांसमोर घेऊन येणार असल्याचे हा ट्रेलर पाहून स्पष्ट होते. या चित्रपटात दिलजीत दोसांझ मुख्य भूमिकेत आहे. तर मराठमोळी अभिनेत्री शर्वरी वाघ यात नायिकेच्या भूमिकेत आहे. या कहाणीची सुरुवात दिलजीत आणि नसीरुद्दीन शाह यांच्या भूमिकेने होते. नसीर यांची भूमिका स्वत:च्या अखेरच्या घटका मोजत असून काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्याचे सांगणे अन् तडफड कुणीच समजू शकत नाही. अखेरीस दिलजीत साकारत असलेली भूमिका ही जबाबदारी स्वीकारते. मग कहाणी फ्लॅशबॅकमध्ये जाते, ज्यात वेदांग रैना आणि शर्वरी वाघच्या भूमिकेची प्रेमकहाणी दाखविली जाते. या प्रेमकहाणीचा अंत वेदनादायी दाखविण्यात येतो. अखेर दिलजीत, नसीरुद्दीन, वेदांग आणि शर्वरी साकारत असलेल्या भूमिका परस्परांमध्ये कशा जोडल्या जातात हे चित्रपट पाहिल्यावरच कळणार आहे. इम्तियाजकडून दिग्दर्शित 'मैं वापस आऊंगा' हा चित्रपट १२ जून रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाला ए.आर. रहमान यांचे संगीत आहे. तर या चित्रपटासाठी इरशाद कामिल यांनी गीतलेखन केले आहे. ट्रेलरमध्यही रहमान यांच्या संगीताच्या जादूची जाणीव होते.



# श्रद्धाने दिली प्रेमाची कबुली?

श्रद्धा कपूर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते आणि तिच्या दैनदिन जीवनातील घडामोडी चाहत्यांसह शेअर करत असते. अभिनेत्रीचा सोशल मीडियावर खूप मोठा चाहतावर्ग आहे. अनेकदा ती तिचे सुंदर फोटो आणि काहीवेळा गंमतीशीर व्हिडीओ शेअर करत असते. अशातच आता तिने नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामुळे ती पुन्हा चर्चेत आलीये. श्रद्धा कपूर तिचा बॉयफ्रेंड राहुल मोदीबरोबर अनेकदा फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते. अशातच आता तिने इन्स्टाग्रामवर तिचा एक व्हिडीओ शेअर केलाय जो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये अभिनेत्री मनसोक्त डान्स करताना दिसत आहे. श्रद्धा या व्हिडीओमध्ये मायकल जॅकसनच्या गाण्यावर थिरकताना दिसतेय. यावेळी तिने कमेंट सेक्शनमध्ये तिच्या अनेक चाहत्यांना प्रतीउत्तर देत तिला अलीकडेच आलेला 'मायकल' हा चित्रपट आवडला असून सध्या ती त्यांतच मग्न असल्याचं तिने म्हटलं आहे. श्रद्धाने शेअर केलेला हा व्हिडीओ तिचा बॉयफ्रेंड राहुलने शूट केला असून तिने या व्हिडीओला कोणीतरी असा शोधा जो तुमच्यातील असं रूप बाहेर आणू शकेल.

अशी कॅप्शन देत ती राहुलला डेट करत असल्याच्या अफवांना दुजोरा दिला आहे. राहुलबरोबर असताना श्रद्धा अनेकदा डान्स करत असते आणि ते व्हिडीओ ती पोस्ट करत असते. श्रद्धाचा डान्स पाहून नेटकऱ्याने या व्हिडीओखाली 'हृतिक रोशनच्या मावशीची मुलगी' अशी कमेंट केली जिला तिने रिप्लायसुद्धा दिला आहे. अशा अनेक कमेंट्स या व्हिडीओखाली पाहायला मिळत आहेत. अनेक चाहत्यांनी तिच्या डान्सचं कौतुक केलं आहे. वृत्तानुसार श्रद्धा व राहुल २०२२पासून एकमेकांना डेट करत आहेत. दोघे जवळपास साडे तिन वर्षे एकमेकांबरोबर असल्याचं म्हटलं जात आहे. शिवाय दोघे अनेकदा एकत्र सार्वजनिक ठिकाणी स्पॉटही होत असतात. राहुल मोदीबद्दल बोलायचं झालं तर तोसुद्धा दिग्दर्शक असून अलीकडेच त्याने अभिनेत्री अनित पड्डाच्या जाहिरातीचं शूटिंग केलं होतं. श्रद्धाने इन्स्टाग्रामवर पोस्टही केली होती. शिवाय काही चित्रपटांसाठी त्याने साहाय्यक दिग्दर्शक म्हणून कामही केलं आहे.



आपल्या दैवी सुरांनी चाहत्यांच्या मनावर राज्य करणाऱ्या सुमन कल्याणपूर यांचं ३१ मे रोजी वयाच्या ८९व्या वर्षी निधन झालं आहे. सुमन कल्याणपुर नुसते नाव जरी उच्चारले तरी निर्मळ शांत, सोज्वळ, सात्विक चेहरा आणि तेवढाच मधुर आवाज आठवतो. त्यांची गाणी जितकी प्रसिद्ध झाली तितक्याच त्या प्रसिद्धीपासून अलिप्त राहिल्या. त्यांचा जन्म. २८ जानेवारी १९३८ ढाका येथे झाला. सुमन हेमाडी हे नाव लग्नाआधीचे. वडील शंकरराव हेमाडी हे सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये वरिष्ठ पदावर होते. वडिलांच्या बदलीमुळे कुटुंब मुंबईत स्थायिक झाले, तिथे त्यांच्या कलाप्रवासाची सुरुवात झाली. नैसर्गिक आवाजाने त्यांना संगीताच्या वाटेवर आणले. रामानंद कल्याणपुर यांच्याशी लग्न होऊन त्या सुमन कल्याणपुर या नावाने सर्व परिचित झाल्या. त्यांच्या संगीत प्रवासाचा, जीवनाचा मागोवा घेणारा हा लेख...

# वाट इथे स्वप्नातील संपली जणू...

श्रद्धांजली
**मंगला खाडिलकर**

देवाने दिलेली कला आणि विद्या कलावंताने निष्ठेने जपली पाहिजे, हा विचार घेऊन जगणाऱ्या गायिका म्हणजे सुमन कल्याणपूर. त्यांच्या वयाने त्यांच्या स्वरातील तारुण्य अखेरपर्यंत हिरावून नेलं नाही. त्यांची सौंदर्यवेधक दृष्टी थक्क करणारी होती. स्वरांशी असलेलं त्यांचं नातं अगदी वेगळं होतं. त्यांच्या निधनामुळे स्वरसृष्टीमध्ये निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन निघणारी नाही. त्यांच्या संगीत प्रवासाचा, जीवनाचा मागोवा घेणारा हा लेख...

'भावगीत' ही महाराष्ट्राची मिरासदारी. साहित्य आणि संगीताच्या आवडीतून भावगीतांचा प्रवास आपल्याकडे सुरु झाला. भावगीतांना आपल्याकडे एक सांस्कृतिक वारसा लाभला आहे. महाराष्ट्राचं भावगीत सुबोध आहे, सोपं आहे. प्रेम, वात्सल्य, संयमित श्रृंगार, प्रतीक्षा या भावनांचं दर्पण असलेली भावगीतं आपल्याकडे तयार झाली. या भावगीतांमध्ये प्रामुख्याने तीन स्वर उमटलेले दिसतात. त्यात एक लताबाईंचा, दुसरा आशाबाईंचा आणि तिसरा सुमनताईंचा! लताबाई आणि सुमनताईंच्या आवाजात साधर्म्यस्थळं असली, तरी त्यांच्यात फरक लक्षात येईल इतका वेगळेपणा निश्चित आहे. आपण जर बारकाईने लतादीदींचं आणि सुमनताईंचं गाणं ऐकलं, तर त्याच्यामध्ये फरक आहे. लतादीदींचा आवाज नाजूक असला, तरी जोरकस आहे. लतादीदींची आणि सुमनताईंची शब्द टाकण्याची शैलीही वेगळी आहे. सुमनताईंचा आवाज सौम्य आहे. एका विशिष्ट शैलीमध्ये आम्हाला अमुक अमुक गीत हवं आहे, अशी संगीतकारांनी कदाचित बंधनं घातली असावी किंवा त्यांनी स्वतःहून ती बंधनं स्वीकारली असावी. मात्र, अशात सुद्धा विशिष्ट चौकटीतून मुक्त झालेली सुद्धा काही गाणी आहेत. लतादीदी हा सर्वार्थाने युगधर्माचा स्वर. लतादीदींमुळेच सिनेसृष्टीतील पार्श्वगायनाला सुवर्णयोगाची झळाळी मिळाली. त्यामुळे तुलनेची चर्चा अप्रस्तुत आहे. केशवराव भोळे, यशवंत देव, नवरंग नागपूरकर यांनी सुमनताईंवर भावसंगीताचे संस्कार केले. यशवंत देव संगीताचे मर्मज्ञ होते. सुमनताईंची अभिव्यक्ती अधिक कोमल आहे, हे माझं म्हणणं आहे. गाण्यांमध्ये वेगवेगळ्या हरकती त्या सहज घेतात. पण, त्यापेक्षा आपल्या गळ्याची सहज सुंदर फिरक वापरणं त्यांना अधिक आवडतं. त्यांची शैली अधिक स्वरशरण आणि संयमी होती. सुमनताईंनी गाण्यातून जो आपल्याला आनंद दिला, त्याची अनुभूती घेणं जास्त गरजेचं आहे, असं मला वाटतं. बारीक आणि पातळ आवाज असला की कुठेतरी साधर्म्य असणं स्वाभाविक आहे. मात्र, भावनिक परिपूर्तता करण्याची दोघींची शैली वेगळी आहे आणि दोघींचा स्वरांचा लगावही तितकाच भिन्न आहे. सुमनताईंसमोर जी गाणी आली, त्याचं त्यांनी अक्षरशः सोनं केलं. सुमनताईंच्या गाण्यांमध्ये किंचित कंपनयुक्तता आहे. त्यामुळे ते जे एक कंपन आहे ना, ते भावनेची अभिव्यक्ती करताना अलंकार होऊन जातं. त्या काळात यशवंत देव त्यांच्याकडून एखाद् दुसरे गाणे गाऊन घेत होते किंवा केशवराव भोळे त्यांच्याकडून गाऊन घेत होते. दशरथ पुजारी हे सुमनताईंकडे आलेले पहिले संगीतकार. यानंतर 'सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले', 'नंदा घरी नंदनवन फुलले' अशी एक एक गाणी करीत जवळपास ४० ते ४५ गाणी झाली. सुमनताईंना पूर्वीपासून प्रवासाची फार आवड होती.

'कोरोना'च्या काळामध्ये अनेक माणसं हताशपणे आढ्याकडे डोळे लावून बसली होती. मात्र, सुमनताईंजवळ त्यांची कला होती आणि या कलेचा उपयोग त्यांनी रमण्यासाठी केला. त्यांची सौंदर्यवेधक दृष्टी मला नंतर कळायला लागली. जगण्याची प्रत्येकाची एक शैली असते. पानं, फुलं, त्यांचे रंग घेऊन सुमनताई जगल्या. सकाळी डोळे उघडले की फुलाकडे लक्ष जायला हवं. झाडाकडे बघायला हवं. निसर्ग त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य होता. सुमनताई मनसोक्त पूजा करायच्या. अत्यंत पारखून देवाला फूल वाहायच्या, देवापुढे गायच्या. सर्वार्थाने त्या आपलं नाव जगत होत्या. जगण्याची एक वेगळी शैली मला त्यांच्याकडून कळली. दुसरी एक गोष्ट म्हणजे, आहाराबद्दलही त्या कायम जागरुक होत्या. आपला देह आणि आपलं मन एकमेकांपासून वेगळं नाही. त्यामुळे देहाला सुद्धा चांगलं ठेवायला पाहिजे, असं त्या म्हणायच्या. देवाने दिलेली कला आणि विद्या कलावंताने निष्ठेने जपली पाहिजे, हा विचार घेऊन त्या जगल्या. कला ही अत्यंत पवित्र गोष्ट आहे, ती मलीन होईल, असं वागणं योग्य नाही. कलाकार संपूर्ण निष्ठेने, कणाकणाने आपल्या कलेची वास्तू उभी करत असतो. त्या वास्तूला तडा जाणार नाही ना, याची काळजीसुद्धा कलाकाराला स्वतःलाच घ्यायची आहे, यावर त्यांचा नितांत विश्वास होता.



एका बाजूला रसिकांचं प्रेम, लोभ होतं, तर दुसऱ्या बाजूला त्यांची तब्येत त्यांना त्यांच्या मर्यादा सांगायची. त्यांच्या वयाने त्यांच्या स्वरातील तारुण्य अखेरपर्यंत हिरावून नेलं नाही. आता जेव्हा त्या अंथरुणाला खिळल्या, तेव्हा नाकाने श्वास घेणं त्यांना जड जाऊ लागलं. तोंडाने श्वास घेतल्यामुळे अगदी शेवटी त्यांचा आवाज बदलला. सुंदरता ही स्वभावात असते आणि मग ती आपल्या वृत्तीत येते आणि वृत्तीतली सुंदरता आपल्या कलेमध्ये येते. त्या आविष्कारामध्ये उतरते आणि सगळीकडे पसरते, त्यातून त्याची आभा तयार होते. सुमनताई यामुळेच वेगळ्या होत्या!

# 'मामाच्या गोव्याला जाऊया'त झळकणार 'हे' कलाकार

गोवा म्हणजे प्रत्येक फ्रेंड सर्कलच्या गप्पांमध्ये हमखास येणारा विषय. यार, एकदा तरी गोव्याला जायचंच! हा प्लॅन प्रत्येक ग्रुपमध्ये बनवला जातो. काहींचा हा प्लॅन फसतो, तर काहींना हा अनुभव कायमस्वरुपी लक्षात राहणारा ठरतो. अशाच मैत्री, धमाल, वेडेपणा आणि नॉस्टॅल्जियाने भरलेल्या एका भन्नाट ट्रिपची गोष्ट आता मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. दिग्दर्शक विजू माने यांच्या आगामी 'मामाच्या गोव्याला जाऊया' या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे. 'स्ट्रगलर साला' या गाजलेल्या सीरिजनंतर विजू माने पुन्हा एकदा मित्रांच्या जगात घेऊन जाणारा, हसवणारा आणि तितकाच रिलेट होणारा चित्रपट घेऊन येत आहेत. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर या गोवा ट्रिपमध्ये नेमकं कोण सहभागी असणार, याची उत्सुकता सर्वानाच होती. अखेर या भन्नाट गँगमध्ये कुशल बद्रिके, अभिजीत चव्हाण आणि संतोष जुवेकर ही 'स्ट्रगलर साला'मधून लोकप्रिय झालेली तिकडी पुन्हा एकदा एकत्र झळकणार आहे. विशेष म्हणजे या धमाल गँगमध्ये आता अंकुश चौधरीची सुद्धा एन्ट्री झाली आहे. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक विजू माने म्हणतात, 'मामाच्या गोव्याला जाऊया' हा फक्त गोव्याला जाण्याचा प्रवास नाही, तर मित्रांसोबत जगलेल्या क्षणांचा खजिना आहे. प्रेक्षकांना थिएटरमध्ये बसून स्वतःच्या मित्रांची आणि त्यांच्या ट्रिप्सची आठवण आल्याशिवाय राहाणार नाही.




फ्रेंडशिप, फन आणि फिल्म यांचा सुंदर मेळ यात अनुभवायला मिळणार आहे.फ्रेंडशिप डेच्या आठवड्यात म्हणजेच ३१ जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती विजू माने यांनी केली आहे. तर पटकथा आणि संवाद विजू माने, राहुल आवटे आणि कुशल बद्रिके यांचे आहेत.

# ...तर 'करुप्पू' सिनेमात दिसले असते विजय!

दाक्षिणात्य सिनेसृष्टीत सध्या अभिनेता सूर्या आणि तृषा कृष्णन यांच्या करुप्पू या सिनेमाची जोरदार चर्चा सुरु आहे. अलिकडेच १५ मार्च रोजी हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटातून सूर्या आणि तृषा कृष्णनची जोडी तब्बल २० वर्षांनं एकत्र पाहायला मिळत आहे. हा ॲक्शन ड्रामा चित्रपटगृहात प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाईचे नवनवीन विक्रम रचत आहे. परंतु, तुम्हाला माहितीये का? या चित्रपटासाठी अभिनेते थलापती विजय यांना पहिल्यांदा विचारणा करण्यात आली होती. स्वत: करुप्पूचे दिग्दर्शक आर. जे. बालाजी याबद्दल खुलासा केला आहे. 'करुप्पु' चित्रपटाचे दिग्दर्शक आर. जे. बालाजी यांनी अलिकडेच हॉलिवूड रिपोर्टर ला मुलाखत दिली. त्यावेळी चित्रपटाबद्दल बोलताना त्यांनी सांगितलं, मी या चित्रपटाबद्दल विजय सरांसोबत चर्चा केली होती. राजकारणात पूर्णवेळ प्रवेश करण्यापूर्वी त्यांचा हा शेवटचा चित्रपट असणार होता. अभिनय कारकीर्दीतील हा शेवटचा चित्रपट असल्याने त्यांना याकरता खूप विचार करावा लागला. यासाठी आमची दोन- तीनदा मिटिंग देखील झाली. पण, त्यांनी काही कारणास्तव हा प्रोजेक्ट करु शकणार नाही, असं सांगितलं. यानंतर, त्यांनी चित्रपटाची कथा सूर्याला ऐकवली. चित्रपटाती कथा ऐकून अभिनेता खूप प्रभावित झाला आणि त्याने काम करण्यास होकार दिला. करुप्पु' चित्रपटाबद्दल बोलायचं झालं तर, दिग्दर्शक आर. जे. बालाजी यांच्या या सिनेमात सूर्या, त्रिशा कृष्णन, योगी बाबू यांच्या भूमिका आहेत. हा एक ॲक्शन-ड्रामा चित्रपट असून यात सूर्या आणि तृषा वकिलांच्या भूमिकेत आमनेसामने दिसत आहेत.



# साऊथ स्टार 'सूर्याचा' दिलदारपणा!



साऊथ फिल्म इंडस्ट्रीतील कलाकारांच्या दिलदारपणाची नेहमीच चर्चा होते. आरआरआर चित्रपटाच्या यशानंतर अभिनेता राम चरणने त्याच्या चित्रपटाच्या टीमला सोन्याची नाणी भेट दिली होती. त्याचबरोबर अभिनेते कमल हासन यांनी 'विक्रम' या चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक लोकेश कनगराज यांना नवीन कार भेट दिली होती. तर सहाय्यक दिग्दर्शकांना बाईक भेट केल्याचं पाहायला मिळालं होतं. आता असाच दिलदारपणा साऊथमधल्या एका प्रसिद्ध अभिनेत्याने दाखवला आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या त्याच्या चित्रपटाने जगभरात ३०० कोटींपेक्षा अधिक कमाई केल्याने या नायकाने आनंदाच्या भरात असं काही केलं ज्याची सगळीकडे चर्चा होताना दिसतेय. दरम्यान, हा अभिनेता दुसरा तिसरा कोणी नसून सूर्या आहे. अलिकडेच अभिनेता सूर्या आणि तृषा कृष्णन स्टारर करुप्पू हा सिनेमा सर्वत्र प्रदर्शित झाला. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवसापासून या चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर दबदबा पाहायला मिळतोय. प्रदर्शनाच्या अवघ्या काही आठवड्यातच करुप्पू सिनेमाने जगभरात ३०० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला आहे. चित्रपटाला मिळालेलं हे यश पाहून सूर्याने उत्कृष्ट कामाबद्दल संगीतकार साई अभ्यंकर, सिनेमॅटोग्राफर जी. के. विष्णू आणि एडिटर सेल्वमणी यांना ३० लाख रुपयांच्या गाड्या भेट म्हणून दिल्याचं कळतंय. 'करुप्पु' चित्रपटाबद्दल बोलायचं झालं तर, दिग्दर्शक आर. जे. बालाजी यांच्या या सिनेमात सूर्या, त्रिशा कृष्णन, योगी बाबू यांच्या भूमिका आहेत. हा एक ॲक्शन-ड्रामा चित्रपट असून यात सूर्या आणि तृषा वकिलांच्या भूमिकेत आमने सामने दिसत आहेत.

## 'केजीएफ ३' आणि 'सालार २' येणार का?

प्रशांत नील हे भारतीय चित्रपटसृष्टीतील अत्यंत यशस्वी दिग्दर्शक आहेत. 'केजीएफ' व 'सालार' सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांसाठी ते जगभर ओळखले जातात. यातच आता 'केजीएफ ३' आणि 'सालार २'बद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. नुकतंच प्रशांत नील यांच्या 'ड्रॅगन' या चित्रपटाचा 'फर्स्ट लूक' रिलीज करण्यात आला. या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत प्रशांत नील म्हणाले, तुम्ही 'ड्रॅगन'ला माझ्या 'डार्क गँगस्टर' प्रकाराचा अंतिम अध्याय मानू शकता. मला 'केजीएफ', 'सालार' आणि 'ड्रॅगन' या तिन्ही कथा सांगायच्या होत्या. या तिन्ही कथा एकमेकांपेक्षा खूप वेगळ्या आहेत. मी कलर पॅलेट सारखंच वापरलं आहे, त्यामुळे त्या दिसायला सारख्या वाटू शकतात. प्रशांत नील यांच्या या निर्णयामुळे 'केजीएफ ३' आणि 'सालार २' च्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दोन्ही चित्रपटांचा शेवट पुढील भागाची हिंट देणारा होता. या सिक्वेलबद्दल विचारले असता प्रशांत नील स्पष्टपणे म्हणाले, सध्या माझे संपूर्ण लक्ष फक्त आणि फक्त 'ड्रॅगन'वर केंद्रित आहे. 'केजीएफ ३' आणि 'सालार २' विषयीच्या चर्चा अधूनमधून होत असतात. पण जर मला आता एखादी नवीन कल्पना सुचली, तर मी तिचा समावेश भविष्यातील सिनेमात करण्याऐवजी 'ड्रॅगन'मध्येच करेन. प्रशांत नील यांच्या या वक्तव्यांवरून सध्या तरी ते या चित्रपटांकडे लवकर परतण्याच्या मूडमध्ये नसल्याचं दिसत आहे.

साऊथ सिनेसृष्टीची 'क्वीन' तृषा कृष्णन सध्या तिच्या अभिनयापेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळे अधिक चर्चेत आहे. अभिनेता आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलापती विजय यांच्यासोबत तिचे नाव जोडले जात असून, सोशल मीडियावर तिला सातत्याने ट्रोल केले जात आहे. अखेर या संपूर्ण ट्रोलिंगवर तृषाने मौन सोडले आहे. तिने ट्रोलर्सना अत्यंत सडेतोड आणि थेट प्रत्युत्तर दिले आहे. तिने तिच्या पाळीव कुत्र्याचा एक क्युट व्हिडीओ शेअर करत ट्रोल करणाऱ्यांची बोलती बंद केली आहे. तृषाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तिचा लाडका पाळीव कुत्रा बेडवर आरामात झोपलेला दिसत आहे. या व्हिडीओसोबत कॅप्शनमध्ये



## माझ्या आयुष्यात ढवळाढवळ करण्याची फक्त त्यालाच परवानगी

त्रिशाने लिहिले, फक्त यालाच मी माझ्या आयुष्यात आणि कामात ढवळाढवळ करण्याची परवानगी देते. या पोस्टद्वारे तिने स्पष्ट केले आहे की, तिच्या पाळीव प्राण्याव्यतिरिक्त इतर कोणालाही तिच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावण्याचा अधिकार नाही. विजय आणि तृषाच्या नात्याबद्दल सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चा सुरू आहेत. नुकतेच हे दोघे प्रसिद्ध अभिनेता अजित कुमार याच्या चेन्नईतील घरी एकत्र दिसले होते, ज्यामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा प्रकाशझोतात आले. अजित कुमारच्या आई मोहिनी मणी यांचे नुकतेच निधन झाले. ही दु:खद बातमी कळताच अजित तात्काळ चेन्नईला परतला होता. चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गजांनी अजितच्या घरी जाऊन त्याचे सांत्वन केले. या कठीण काळात थलापती विजय कडेकोट सुरक्षेत अजितच्या घरी पोहोचला आणि त्याने अजितला मिठी मारून धीर दिला. त्यानंतर लगेचच, तृषा देखील काळ्या रंगाच्या सलवार सूटमध्ये अजितच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी तिथे पोहोचली. दोघांची वेळ आणि उपस्थिती पाहून सोशल मीडियावर पुन्हा एकदा उलट- सुलट चर्चा सुरू झाल्या. तथापि, या सर्व अफवांवर आणि सोशल मीडियावरील चर्चांवर विजय किंवा तृषा या दोघांपैकी कोणीही अद्याप अधिकृत विधान केलेले नाही.




**'आना मेरी जान, मेरी जान। संडे के संडे...' १९४७ सालच्या 'शहनाई' चित्रपटातील हे गाणे माहीत नसलेला विरळाच! दर्जेदार काव्य वा शास्त्रीय साजात नटलेले नसेल म्हणून काय झाले; देशभर या गाण्याने ग्रामीण, शेतकरी, मेंढपाळ, गुराखी या लोकांना अक्षरशः रिझविले. ही किमया सी. रामचंद्र (अण्णासाहेब) या संगीतकाराने सिनेमा माध्यमातून करून दाखवली. महालात राहणाऱ्यांसाठीच गाणी असावी ही मिरासदारी मोडून मोहल्ल्यात राहणाऱ्यांनाही आनंद मिळावा असे सिनेसंगीत असावे, या मताचे सी. रामचंद्र होते. मुख्य म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ या स्वातंत्र्यप्राप्ती दिनी हा चित्रपट प्रदर्शित झाला. स्वतंत्र भारताचे स्वागत 'शहनाई'ने केले.**

१९५० सालच्या 'समाधी' चित्रपटात लता व अमीरबाई यांच्या ठसक्याने गायलेल्या स्वरातील करिष्मा, अण्णांनी अंग्रेजी छोरिंसारख्या छत्र्या फिरवून नाचण्याच्या गाण्यात अभिनव पद्धतीने उजागर केला. 'टम टम से झाको ना राणीजी। गाडीसे गाडी लड जायेगी...' १९४९ च्या 'नमुना' सिनेमातील या गाण्यात शमशाद बेगम यांच्या ईश्वरदत्त टोकदार पण नशिल्या सुरांच्या स्वैर नर्तनाचा अभिनव प्रयोग अण्णांनी केला. 'खुशिया मनाये क्यू न हम। हम किसीसे क्यू डरे। किस्मत हमारे साथ है। जलने वाले जला करे' १९४८ सालच्या 'खिडकी' चित्रपटात मोहम्मद रफी यांचा गायक म्हणून जम बसण्याच्या काळात अण्णांनी हे स्वैर व उत्साह प्रदर्शित करणारे अजरामर गाणे स्वतःच्या साथीत गाऊन घेतले. 'मेरे पिया गये रंगून किया है वहासे टेलिफुन...' १९४९ सालच्या 'पतंगा' चित्रपटातले हे रंगतदार विनोदी गीत स्वतःच्या आवाजात गाऊन पुन्हा एकदा अशा गाण्यातील मिरासदारी सिद्ध केली.

अण्णांनी पाश्चात्त्य व भारतीय वाद्यांचा सुरेख मेळ बसवून सुश्राव्य अभिनव स्वरसंगती जन्मास घातली. 'जाझ' हा पाश्चिमात्य वाद्यवृंद प्रकार आवडला. मुंबईस मोठमोठ्या हॉटेलमध्ये जाऊन जाझ संगीत ऐकायचे. तिथे चीक चॉकलेट हा कलाकार वाद्ये वाजवायचा. पुढे त्यांना अण्णांनी आपला असिस्टंट म्हणून ठेवले. खऱ्या अर्थी अण्णा हे सिनेमातील माधुर्य घराण्याचे पाईक. दिग्गज अनिल विश्वास यांचे शिष्य व मदनमोहन यांचे गुरू. गाण्यात माधुर्य कसे पेरावे हे मदनमोहन सी. रामचंद्रपासून शिकले. 'मेहफिल मे जल उठी शमा। परवानेके लिये...' अण्णांच्या भारतीय संगीतातील सदाबहार करिष्मा म्हणजे १९५१ च्या 'निराला' चित्रपटातील ही विराणी. मिश्र भैरवी रागात लता यांच्या गळ्यातील गांधाराला स्पर्शून स्वतःला सृजनाचे संगीतकार सिद्ध केले. कित्येक संगीतकारांनी या गाण्याच्या बांधणीवर अनेक गाणी तयार केलीत, अशी प्रांजळ कबुली दिली आहे. 'जब दिलको सताये गम। तू छेड सखी सरगम...' प्रत्येक राग मानवी भावनांशी निगडित असतो. दुःखाचा ओघ कमी व्हावा किंवा विसरावा म्हणून नायिका रेहाना व पारो सतारीच्या साथीत लता यांचा स्वर्गीय स्वर या गाण्याद्वारे साकार करतात. सी. रामचंद्र या महान संगीतकाराची ही अमर रचना त्या काळी सिलोन रेडिओवरील छायागीत कार्यक्रमाची सिग्नेचर ट्यून म्हणून वाजवली जायची, हे विशेष. 'तुम क्या जानो, तुम्हारी याद मे हम कितना रोये...' १९५२ सालच्या 'शिनशिनाके बुबला बु' या सिनेमात लता यांच्या गळ्यातील लाखो स्वररत्नांपैकी नेमका कोहिनूर स्वर काढण्यात अण्णा यशस्वी झालेत. लता यांच्या १० उत्कृष्ट गाण्यांपैकी हे गाणे आहे. अतिशय शांततेने एकेका शब्दातील मार्दव उकलीत अण्णांनी चाल बांधली. खरोखर तो काळ सिनेगीतांचा सुवर्णकाळच होता. तसे संगीत पुन्हा झालेच नाही, हे स्वीकारावेच लागते. 'देख हमे आवाज ना देना। ओ बेदर्द जमाने...' वास्तविक हे १९५८ च्या 'अमरदीप' चित्रपटातले साधे प्रणयगीत; पण संगीतकाराने चालीतील चढ- उतार, स्वरांची बांधणी, मधेच किंचित आलापी व प्रेमसाफल्याचा भाव चपखलपणे या रागिणीत अंतर्मुख करून हे गाणे मधुर केले. 'ये जिंदगी उसी की है। जो किसी का हो गया...'

सी. रामचंद्र यांच्या प्रसिद्धीचा सर्वात मोठा स्रोत म्हणजे 'अनारकली'तील हे गाणे. या गाण्यातील करामतीबद्दल मी पुष्कळ लेखात लिहिले आहे. एवढेच सांगेन की, अण्णांनी आपले सर्व गाणकौशल्य पणाला लावून लता यांचे स्वरशिल्प साकार केले आहे. सी. रामचंद्र नेहमी म्हणत की, सृजनाचा आनंद उरी कोंडून ठेवणे अशक्य होई. त्याला सर्वश्रुत करण्याची घाई असे. रेघा रेघांचं चित्र बनतं तसंच स्वरा स्वरांचंही सांगीतिक चित्र आकार घेते. रामचंद्र नरहर चितळकर यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील चितळ या गावी झाला. वडील पुणतांबे येथे रेल्वेत होते. हे कुटुंब पुणतांबे येथे स्थायिक झाले.

शंकरराव सप्रे यांच्या तालमीत श्रीराम संगीत शाळेत सर्वप्रथम गाणे शिकले. त्यांच्या आवाजावर व संगीतज्ञानावर निरनिराळ्या रागाचे रंग चढत गेले. १९४२ साली मा. भगवान यांच्या 'सुखी जीवन' चित्रपटात स्वतंत्र संगीत दिले. दिग्गज निर्माते जयंत देसाई यांच्या सांगण्यावरून सी. रामचंद्र हे नाव ठेवले. त्यांनी १०८ हिंदी, ७ मराठी व इतरही २-३ भाषेत संगीत दिले. एक हिंदी व एक मराठी चित्रपटात नायक साकारला. लता यांनी २०५ तर आशा भोसले यांनी ७९ एकल गाणी त्यांच्या संगीतात गायली. सी. रामचंद्र यांनी स्वतःच्या आवाजात सुमारे ३५ गाणी म्हटली. 'माझ्या जीवनाची सरगम' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. १९६३ सालच्या समर संगीताच्या दिल्ली येथील राजकीय कार्यक्रमातील 'ऐ मेरे वतन के लोगो' या गाण्याला सर्वोच्च बहुमान मिळाला. अनेक सुवर्ण, रजत महोत्सवी चित्रपटांना संगीत देऊनही साधा फिल्मफेअर पुरस्कारही त्यांना मिळाला नाही. संगीत शास्त्राला देशकाल सीमा नाहीत, हे आपल्या श्रुतिमनोहर गाण्यांनी सिद्ध करणारे हरहुन्नरी संगीतकार व गायक सी. रामचंद्र उर्फ अण्णा यांचा संगीत प्रवाह ५ जानेवारी १९८२ रोजी नेहमीसाठी आटला.

**रमेश पोफळी**

# ... तर 'जब वी मेट' मध्ये दिसला असता बॉबी देओल!



नवदच्या दशकात आपला अभिनय, स्टाईल आणि लूकने तरुणाईला वेड लावणारा अभिनेता म्हणजे बॉबी देओल. पदार्पणाच्या पहिल्याच चित्रपटासाठी फिल्मफेअर पटकावणार्या बॉबी देओलला प्रत्यक्षात करिअरमध्ये फार मोठा संघर्ष करावा लागला. ॲनिमलच्या यशानंतर बॉबी देओल चांगलाच प्रसिद्धीझोतात आला आहे परंतु, एक काळ असा होता जेव्हा त्याच्या हातून मोठे प्रोजेक्ट निसटले. तर काही प्रोजेक्टसमधून त्याला वगळण्यात आलं. त्यापैकी एक नाव म्हणजे जब वी मेट. याबाबत नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्याने त्याच्या मनातील सल बोलून दाखवली आहे. सध्या तो त्याचा आगामी 'बंदर' या चित्रपटामुळे प्रचंड चर्चेत आहे. शिवाय या वर्षात त्याचे बरेच सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. अलिकडेच आप की अदालत या शोमध्ये बॉबी देओल उपस्थित राहिला होता.यादरम्यान, त्याने त्याच्या करिअरमध्ये आलेले चढ-उतार तसंच संघर्षकाळावर भाष्य केलं. एकीकडे इंडस्ट्रीत स्वतला सिद्ध करण्याचा संघर्ष सुरु असतानाच अभिनेत्याच्या आयुष्यात असा एक प्रसंग घडला ज्यामुळे त्याला प्रचंड मोठा धक्का बसला होता. २००७ साली प्रदर्शित झालेल्या इम्तियाज अली यांच्या जब वी मेट या सिनेमात सुरुवातीला बॉबी देओव दिसणार होता, मात्र अचानक त्याला रिप्लेस करण्यात आलं. त्याच्याजागी शाहिद कपूरची निवड करण्यात आली. बॉबी देओल 'आप की अदालत'मध्ये म्हणाला, तो विषय आता संपला आहे. आम्ही चांगले मित्र आहेत. पण, तेव्हा माझं मन खूप दुखावलं होतं, कारण माझ्या करिअरच्या त्या टप्प्यावर मला अशा चित्रपटाची खूप गरज होती. बॉबी देओल मग म्हणाला, इम्तियाज अली जेव्हा अभयसोबत 'सोचा ना था' बनवत होता, तेव्हापासून माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता.जेव्हा मी चित्रपटाचा रफ कट पाहिला, तेव्हा त्याचं काम पाहून मी खूप प्रभावित झालो.'तो खूप चांगला दिग्दर्शक आहे, मी त्याच्यासोबत काम करायला हवं. असं तेव्हा मला वाटायचं. तेव्हाच आम्ही एकत्र चित्रपट करायचं ठरवलं. पण जेव्हा आपला वाईट काळ सुरु असतो तेव्हा आपल्याला कोणीही साथ देत नाही. मी ज्या प्रोडक्शन हाउसला चित्रपटाची ऑफर दिली होती, त्यांनी सांगितलं की इम्तियाज खूप महागडे दिग्दर्शक आहेत. पण अखेरीस त्याच प्रोडक्शन हाऊसने इम्तियाज आणि मी ज्या अभिनेत्रीचं नाव सुचवलं होतं, त्यांनाच घेऊन पुढे चित्रपट बनवला. फक्त हिरो बदलण्यात आला होता. अशा गोष्टी घडत असतात. नेहमीच प्रत्येकाच्या बाबतीत फक्त चांगल्याच गोष्टी घडतील असं नसतं. असा खुलासा अभिनेत्याने केला.




## कंगनाच्या चित्रपटात मराठी अभिनेत्रींची वर्णी

कंगना रणौत यांच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाची काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. अशातच आता या चित्रपटाचं मोशन पोस्ट रिलीज झालं आहे. महत्वाचं म्हणजे या चित्रपटात काही लोकप्रिय मराठी कलाकार झळकणार आहेत. कंगना रणौत अलीकडेच त्यांच्या 'क्वीन २' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान स्पॉट झाल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि हातातील हिरवा चुडा यामुळे सगळ्यांचं लक्ष वेधलं होतं. पण तो त्यांचा चित्रपटातील लूक असल्याचं त्यांनी सोशल मीडियामार्फत स्पष्ट केलं होतं. अशातच आता त्यांच्या आगामी चित्रपटाचा पोस्टर समोर आला असून हा सिनेमा १२ जूनला रिलीज होणार आहे. कंगना यांच्या मनीकर्णीका फिल्मस् प्रोडक्शन हाऊसच्या सोशल मीडिया पेजवरुन या चित्रपटाचं मोशन पोस्टर शेअर करण्यात आलं आहे. यापूर्वी ६ मे रोजी चित्रपटाचं पोस्ट शेअर करण्यात आलेलं. समोर आलेल्या या मोशन पोस्टरला 'कुछ खास करके आम ही कहलाते हैं, वो दिखते तो हैं, पर नज़र नहीं आते' अशी कॅप्शन देण्यात आली आहे.या पोस्टरमध्ये कंगना यांचा चित्रपटातील लूक पाहायला मिळत आहे. २००८ साली मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर हा चित्रपट आधारित असल्याचं म्हटलं जात आहे. कंगना यांच्या या चित्रपटात मराठी इंडस्ट्रीतील अनेक लोकप्रिय अभिनेत्री झळकणार आहेत. यामध्ये प्रिया बेर्डे ते गिरिजा ओक या अभिनेत्रींचा समावेश आहे. मनोज तपाडिया दिग्दर्शित या चित्रपटात कंगना मुख्य भूमिकेत असून त्यांनीच या चित्रपटाची निर्मितीसुद्धा केली आहे. तर या चित्रपटात त्यांच्यासह प्रिया बेर्डे आणि गिरिजी ओक यांच्या व्यतिरिक्त स्मिता तांबे, इशा डे, सुहिता थत्ते, आशा शेलार अशा लोकप्रिय मराठी अभिनेत्री झळकणार आहे. त्यामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुक्ता अजून वाढली आहे. दरम्यान, कंगणा शेवटच्या इमर्जन्सी आणि कनप्पा या चित्रपटांत झळकल्या होत्या. त्यांनी आतापर्यंत विविध विषय असलेल्या अनेक चित्रपटांत काम केलं आहे. अभिनयासह दिग्दर्शन आणि निर्मितीसुद्धा त्या करत असतात.

# 'घबाडकुंड' मध्ये 'हा' अभिनेता मांत्रीकाच्या भूमिकेत

मराठी कलाविश्वात गेल्या महिन्याभरात अनेक वैविध्यपूर्ण सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. आता जून महिन्यात आणखी एक जबरदस्त चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या भव्य आणि रहस्यमय सिनेमाचं नाव आहे 'घबाडकुंड'. याच चित्रपटासंदर्भातील एका फोटोची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. संपूर्ण टक्कल, कपाळावर काळा टिळा, गळ्यात माळा आणि या ज्येष्ठ अभिनेत्याच्या डोळ्यात गूढ भाव दिसत आहेत. हे अभिनेते नेमके कोण आहेत? आणि 'घबाडकुंड'मध्ये हे अभिनेते कोणती भूमिका साकारणार आहेत जाणून घेऊया... आपली प्रत्येक भूमिका अत्यंत प्रभावीपणे साकारत रुपेरी पडद्यावर आपली वेगळी ओळख निर्माण करणारे अभिनेते शशांक शेंडे लवकरच प्रेक्षकांसमोर नव्या आणि गूढ भूमिकेत झळकणार आहेत. त्यांच्या दमदार अभिनयामुळे प्रत्येक भूमिकेला वेगळं वजन मिळतं, आणि त्यामुळेच त्यांच्या प्रत्येक भूमिकेबद्दल रसिकांमध्ये कायमच उत्सुकता पाहायला मिळते. 'घबाडकुंड' या आगामी मराठी चित्रपटामध्ये शशांक शेंडे तंत्र- मंत्रात पारंगत असलेल्या सिद्धयोगी मांत्रिकाची भूमिका साकारताना दिसणार आहेत. या चित्रपटात त्यांची व्यक्तिरेखा एका मांत्रिकाची असून, मंत्र आणि तांत्रिक विद्येचा गूढ अभ्यास केलेला 'बाबा' अशी त्यांची ओळख आहे. चित्रपटातील त्यांच्या लूकचीही सध्या चर्चा रंगली आहे. संपूर्ण टक्कल, कपाळावर काळा टिळा, गळ्यात माळा आणि डोळ्यातील गूढ भाव या व्यक्तिरेखेला अधिकच भयावह बनवतात. या भूमिकेबद्दल बोलताना शशांक शेंडे म्हणतात, ही भूमिका खूप वेगळी आणि आव्हानात्मक आहे. एका मांत्रिकाच्या मनोविश्वात शिरून त्याची शक्ती, त्यामागचं तत्त्वज्ञान आणि त्याचा उद्देश प्रेक्षकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच खिळवून ठेवेल. हा रहस्यमय मांत्रिक नेमका कोण आहे? त्याच्या शक्तींचं गूढ काय आहे? आणि त्याचा खरा हेतू काय आहे? हे पाहणं नक्कीच औत्सुक्याचं आहे. या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने एक रहस्यमय 'युनिव्हर्स' पडद्यावर साकारण्याचा प्रयत्न दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील यांनी केला आहे. या संकल्पनेला 'आयकॉन दी स्टाईल' संस्थेचे डॉ. रसिक कदम यांची साथ लाभली आहे. मराठी चित्रपटसृष्टीत नवा ट्रेंड निर्माण करण्याच्या तयारीत असलेला 'घबाडकुंड' येत्या १९ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.






# 'ऑरेंज ज्यूस गँग' आता मोठ्या पडद्यावर!

रीलसवर धुमाकूळ घालणारी आणि सर्वांना खळखळून हसवणारी 'ऑरेंज ज्यूस गँग' आता मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. नुकतीच या नव्या चित्रपटाची झलक प्रेक्षकांसमोर आली आहे. या सिनेमाचं नाव आहे 'भूतम भयम्'! येत्या २४ जुलैला हा हॉरर- कॉमेडी चित्रपट प्रदर्शित होणार आहे. भय आणि हास्याचं जबरदस्त मिश्रण असलेल्या या चित्रपटात सोशल मीडियावरचे स्टार क्रिएटर्स एकत्र झळकणार आहेत. ज्यांनी आपल्या भन्नाट रील्समधून, कॉमिक टायमिंग साधत आणि मजेशीर कंटेंटमुळे आधीच लाखो प्रेक्षकांची मनं जिंकून घेतली आहेत. 'भूतम भयम्' या चित्रपटात करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे, सिद्धांत सरफरे, शुभम जाधव, पुष्कराज चिरपुटकर आणि मनमीत पेम एका हटके आणि धम्माल अवतारात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. चित्रपटाच्या नावातच रहस्य, मजा आणि थोडासा गोंधळ दडलेला असताना, या हॉरर-कॉमेडीमागची नेमकी कथा काय आहे? हे सगळे कोणत्या भानगडीत अडकणार आहेत? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना लवकरच मिळणार आहेत. दिग्दर्शक रामचंद्र अरुण गांवकर या सिनेम ाबद्दल सांगतात, हा चित्रपट मराठीतील नव्या दमाच्या फळीने मांडलेला युथफुल विचार आहे. लेखक-दिग्दर्शक म्हणून हा माझा पहिला चित्रपट. प्रेक्षकांना विलक्षण थिएटरीकल अनुभव देण्यासाठी 'भूतम भयम्'ची टीम २ वर्षांपासून मेहनत घेतेय. सात बेरोजगार मित्रांची ही गोष्ट हॉरर कॉमेडीच्या एका अद्भुत जगात प्रेक्षकांना घेऊन जाईल. दंतकथेचं हे जग मराठीत पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येतंय. निर्माते नरेन कुमार म्हणतात, निर्माता म्हणून हिंदीत 'जॉली.एल.एल.बी' सारखा चित्रपट केल्यानंतर मराठीत काहीतरी वेगळं, विलक्षण करायचं हा विचार नेहमीच होता. 'भूतम भयम्' हा तो भव्य अनुभव आहे असं मी म्हणेन. दृश्यसंकल्पना हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे आणि त्यासाठी लागणारं सगळं तांत्रिक, कलात्मक पाठबळ निर्माता म्हणून देण्याचा आम्ही पूर्ण प्रयत्न केलाय! या जोडीला आम्हाला झी स्टुडिओजची प्रस्तुतकर्ता म्हणून लाभलेली साथ ही नक्कीच मोलाची आहे. 'भूतम भयम्' हॉरर कॉमेडी विश्वातला गेमचेंजर सिनेमा ठरेल यात शंका नाही. या चित्रपटाची निर्मिती नरेन कुमार आणि महेश ज्ञानदेव कोरडे यांनी केली असून, कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शनाची जबाबदारी रामचंद्र अरुण गांवकर यांनी सांभाळली आहे. हा 'भूतम भयम्' सिनेमा २४ जुलैला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# दहा वर्षांपासून अभिनय सोडायचा विचार



बॉलिवूडमधील एक कसलेले आणि प्रतिभावान अभिनेते म्हणून मनोज बाजपेयी यांचे नाव आदराने घेतले जाते. 'सत्या' चित्रपटातील भिकू म्हात्रे असो, शूल, झुबेदा असो किंवा गँग्स ऑफ वासेपूरमधील सरदार खान, मनोज बाजपेयी यांनी आपल्या अष्टपैलू अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. मात्र, सध्या या अभिनेत्याच्या मनात उलथापालथ सुरू आहे. गेल्या १० वर्षांपासून आपण अभिनय क्षेत्रातून संन्यास घेण्याचा विचार करत असल्याचा धक्कादायक खुलासा खुद्द मनोज बाजपेयी यांनी केला आहे. एका मुलाखतीत त्यांनी अभिनयाच्या प्रवासात आपण पालकांपासून कसे दुरावलो आणि चित्रपटांतील गंभीर भूमिकांमुळे मानसिक आरोग्यावर कसा परिणाम झाला, यावर मोकळेपणाने भाष्य केले. आपल्या अभिनयातील या प्रवासाबद्दल बोलताना मनोज बाजपेयी म्हणाले, जेव्हा तुम्ही वर्षानुवर्षे अतिशय गंभीर आणि मानसिकदृष्ट्या थकवणाऱ्या भूमिका साकारता, तेव्हा तुमच्या स्वभावात कमालीचा चिडचिडपणा येतो. तुमचे मूड स्विंग्स खूप वाढतात. गेल्या दहा वर्षांत माझ्या मनात अनेकदा अभिनय सोडण्याचा विचार आला. पण प्रत्येक वेळी एखादी उत्तम भूमिका माझ्यासमोर येते आणि मी पुन्हा कॅमेऱ्यासमोर उभा राहतो. अभिनय ही आपली नोकरी किंवा उपजीविकेचे साधन बनू नये, अशी त्यांची इच्छा आहे. मला अभिनयाला केवळ एक कौटुंबिक जबाबदारी किंवा सक्तीचे काम बनवायचे नाही. मला ते आवडीने करायचे आहे, पैशांसाठी किंवा नाईलाज म्हणून नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. 'गली गुलियाँ', 'भोसले' आणि 'जोराम' यांसारख्या चित्रपटांनी मनोज यांच्या मानसिकतेवर खोल परिणाम केला. यावर बोलताना ते म्हणाले, या भूमिका साकारणे सोपे नव्हते. मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या मी त्या पात्रांमध्ये पूर्णपणे गढून गेलो होतो. अशा डार्क (गंभीर) भूमिका तुमच्यातील आत्माच जणू पिळून काढतात. आता मला या चक्रातून बाहेर पडायचे आहे. मला आता एखादा बिनधास्त, हलकाफुलका कमर्शियल चित्रपट करायचा आहे. ज्यामध्ये कोणतीही तयारी करावी लागणार नाही, फक्त गाणी, डान्स आणि धमाल असेल. आपल्या काही गाजलेल्या भूमिकांची आपल्याला आता नीट आठवणही नसल्याचे त्यांनी सांगितले. अनेकदा मला मी साकारलेल्या पात्रांची आठवणही राहत नाही. आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण काढताना मनोज भावुक झाले. ते म्हणाले, माझ्या संघर्षाचे फळ मला मिळाले, पण त्यासाठी मी खूप मोठी किंमत चुकवली. अनेकदा प्रॉडक्शन हाऊसच्या सेटवर गेलो की तिथे शिवीगाळ करून हाकलून दिले जायचे. मी एक आउटसाइडर होतो. पण प्रचंड संघर्ष आणि जिद्दीच्या जोरावर अखेर मी माझे स्थान निर्माण केले, अशा शब्दांत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.



# 'कॉकटेल'चा सिक्वेल १४ वर्षांनंतर येणार

दिग्दर्शक होमी अदजानिया यांनी दिग्दर्शित केलेल्या 'कॉकटेल' चित्रपटाने प्रेम आणि मैत्रीची नवी व्याख्या सांगितली होती. २०१२ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटामध्ये सैफ अली खान, दीपिका पादुकोण आणि डायना पेंटी यांच्या भूमिका गाजल्या होत्या. पुन्हा एकदा नव्या भावनांसह प्रेमाचा हाच गुंता प्रेक्षकांना पाहता येणार आहे. येत्या १९ जून रोजी 'कॉकटेल २' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, 'कॉकटेल २' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे, यामुळे चित्रपटाबाबत नेटकऱ्यामध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. १४ वर्षांनंतर 'कॉकटेल' चित्रपटाचा सिक्वेल येणार असून यामध्ये अभिनेता शाहिद कपूर, रश्मिका मंदाना आणि क्रिती सेनॉन यांच्या प्रमुख भूमिका असणार आहेत. प्रेम, मैत्री, प्रवास आणि भावनांवर आधारित कथानक तरुणाईला आकर्षित करत आहे. 'कॉकटेल २' चित्रपटाचा दमदार ट्रेलर रिलीज झाला असून त्यामध्ये लग्नाभोवती फिरणारा थरारक सस्पेन्स दाखवण्यात आला आहे, त्यामुळे चित्रपटाबाबत प्रेक्षकांची उत्सुकता अधिक वाढली आहे. यामध्ये शाहिद कपूर हा कुणाल, रश्मिका मंदाना ही दिया आणि क्रिती सेनॉन ही ॲली हे पात्र साकारणार आहे. चित्रपटातील गाणी आणि डायलॉग जुन्या चित्रपटाची आठवण करून देत आहे. 'कॉकटेल २' चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात शाहीद कपूरच्या नात्यावर आधारित डायलॉगने होत आहे. यामध्ये मायेची ऊब असते, अशा डायलॉगने ट्रेलरची सुरुवात झाली आहे. प्रेमात मैत्री आणि मैत्रीमध्ये प्रेम अशा भावनांमध्ये अडकलेला 'कॉकटेल २' चित्रपट तरुणांमध्ये बदलेल्या नात्यांची गुंतागुंत मांडत आहे. ग्लॅमर, परदेशातील निसर्गरम्य लोकेशन्स आणि दोन्ही अभिनेत्रींचे स्टायलिश आउटफिट्स यामुळे चित्रपट अधिक आकर्षक वाटत आहे. 'कॉकटेल' चित्रपटातील 'तुम ही हो बंधू' गाणे सुपरहिट ठरले होते. आजही या गाण्याचा मोठा चाहता वर्ग आहे. 'कॉकटेल २'मध्येही हे गाणे असल्याचे ट्रेलरमधून लक्षात येत आहे. 'तुम ही हो बंधू सखा तुम ही' हे गाणे ट्रेलरमध्ये ऐकू येत आहे. मात्र, या गाण्याचा रिमेक करण्यात आला आहे की पुन्हा एकदा तेच गाणे वापरले आहे हे अजून समोर आलेले नाही. पण, या गाण्याची चाल प्रेक्षकांना 'कॉकटेल' चित्रपटाशी कनेक्ट करत आहे.

# अहान पांडे आणि अनीत पड्डाचा पुन्हा धमाका

गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'सैयारा' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. या चित्रपटातील भावुक कथानकाने प्रेक्षकांना चित्रपटगृहातच रडण्यास भाग पाडले होते. या सुपरहिट चित्रपटातून पदार्पण करणारे नवोदित कलाकार अहान पांडे आणि अनीत पड्डा रातोरात स्टार बनले. दिग्दर्शक मोहित सूरीने शोधलेली ही नवी जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आणि चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. आता याच नवीन जोडीबाबत एक मोठी बातमी समोर येत असून अहान आणि अनीतची जोडी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर एकत्र झळकणार असल्याची चर्चा आहे. या आगामी चित्रपटाचे शूटिंग याच वर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या नव्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुराही 'म्यूजिकल लव्हस्टोरी'चा बादशाह मानला जाणारा दिग्दर्शक मोहित सूरीच सांभाळणार आहे. सध्या हा चित्रपट प्री- प्रोडक्शन स्टेजमध्ये असून, ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये चित्रीकरणाला सुरुवात करण्याचे निर्मात्यांचे ध्येय आहे. 'सैयारा' चित्रपट प्रचंड गाजल्यामुळे ही संपूर्ण टीम या नव्या प्रोजेक्टसाठी खूपच उत्सुक आहे. सध्या हे दोन्ही कलाकार आपापल्या इतर प्रोजेक्ट्सच्या चित्रीकरणात व्यस्त आहेत. अहान पांडे प्रसिद्ध दिग्दर्शक अली अब्बास जफर यांच्या आगामी चित्रपटाचे शूटिंग करत असून, जुलै महिन्यापर्यंत तो आपले काम पूर्ण करेल अशी अपेक्षा आहे. दुसरीकडे, अभिनेत्री अनीत पड्डा सध्या 'शक्ती शालिनी' या चित्रपटाच्या कामात व्यस्त आहे. आपापले चालू प्रोजेक्ट्स पूर्ण केल्यानंतर हे दोन्ही कलाकार आपले पूर्ण लक्ष मोहित सूरी यांच्या या रोमँटिक ड्रामा चित्रपटावर केंद्रित करणार आहेत. दिग्दर्शक मोहित सूरी हे बॉलिवूडमध्ये दर्जेदार संगीतमय प्रेमकथा बनवण्यासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी यापूर्वीही अनेक सुपरहिट चित्रपट सिनेसृष्टीला दिले आहेत. 'सैयारा' चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी अहान आणि अनीतच्या करिअरला गती दिली. अशा परिस्थितीत ही हिट जोडी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर एकत्र येणार असल्याच्या बातमीमुळे चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दरम्यान, या चित्रपटाची अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे निर्माते या चित्रपटाची घोषणा कधी करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

